**महत्वाचे**

जा.क्र.कृ.गणना/पीएम किसान/२३१/२०१९
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे ४११ ००५
दिनांक :- ११/०४/२०१९

**प्रति,**

जिल्हाधिकारी सर्व

**विषय :-** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजना तक्रार निवारण समिती गठीत करण्याबाबत

**संदर्भ :-** १. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. किसयो- २०१९/प्र.क्र.२०/भाग-४/११-अे, दि. १५/०२/२०१९
२. या कार्यालयाकडील पत्र क्र कृषि.गणना/पीएम किसान/२२०/२०१९ दि. २/४/२०१९

उपरोक्त संदर्भ क्र.-१ च्या शासन निर्णयानुसार पी.एम किसान योजनेच्या क्षेत्रिय अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली असून, सदर समिती मध्ये निवासी उपजिल्हाधिकारी यांची समन्वय अधिकारी तथा जिल्हास्तरीय नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर जिल्हास्तरीय समितीचे कार्य व जबाबदारीतील मुद्दा क्र. ४ अन्वये क्षेत्रिय स्तरावरील प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करावयाचे आहे.

केंद्रशासनाकडील पत्र क्र.१-१/२०१९-एफडब्ल्युएस, दि. २३ मार्च २०१९ च्या पत्रानुसार जिल्हास्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत सूचित केले आहे. त्याअनुषंगाने सर्व निवासी उपजिल्हाधिकारी यांची तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे व केंद्र शासनास त्याप्रमाणे कळविण्यात आले आहे. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करणेबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

11/4

**आयुक्त कृषि**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**प्रत –** मा. सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव